सांगली मिरज आणि कुपवाड,जळगाव महानगरपालिका
सार्वत्रिक निवडणूक/वसई विरार महानगरपालिकेतील
रिक्त पदाची पोटनिवडणूक - २०१८
मतदार यादी तयार करण्याबाबतचे आदेश

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.-रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.२५/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २३ मे, २०१८

निवडणूक प्राथम्य

प्रति,
आयुक्त,
सांगली मिरज आणि कुपवाड,जळगाव व
वसई-विरार महानगरपालिका

विषय :- सांगली मिरज आणि कुपवाड ,जळगाव महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक व वसई विरार महानगरपालिकेतील रिक्त पदाची पोटनिवडणूक - २०१८ **मतदार यादी तयार करण्याबाबत...**

संदर्भ:- १. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.१०/का-५, दि .०२/०२/२०१८
२. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.१६/का-५, दि १४/०२/२०१८
३. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. २/५/२०१८ चे आदेश(प्रत संलग्न)

महोदय,

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेची मुदत दि.१३ ऑगस्ट, २०१८ रोजी व जळगाव महानगरपालिकेची मुदत दि.१९/०९/२०१८ रोजी संपत असून त्यांची सार्वत्रिक निवडणुक मुदत संपण्यापूर्वी घेणे आवश्यक आहे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रामुख्याने ३ टप्पे असतात :-

(i) प्रभाग रचना
(ii) भारत निवडणूक आयोगाने विधानसभानिहाय तयार केलेल्या मतदार यादीचे Cut-off date रोजी प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय विभाजन
(iii) प्रत्यक्ष निवडणूक

२.१ राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन क्र.१ च्या पत्रानुसार सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची प्रभाग रचना करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. तसेच आयोगाच्या संदर्भांकित अ.क्र.२ च्या पत्रानुसार जळगाव महानगरपालिकेच्या प्रभाग रचनेची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

३. राज्य निवडणूक आयोगाने दि.२/५/२०१८ च्या अधिसूचनेन्वये दि.२१ मे,२०१८ ही Cut-off date जाहीर केली असून, त्या दिवशी(म्हणजेच दि.२१ मे, २०१८ रोजी) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी सार्वत्रिक/पोट निवडणुकीसाठी वापरण्यात येईल.

४. सांगली मिरज आणि कुपवाड व जळगाव महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तसेच वसई विरार महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.९७ मधील रिक्त पदाच्या पोटनिवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याकरीता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

**आदेश**

५. **मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती** - दिनांक ०१/०१/२०१८ हा अर्हता दिनांक धरुन भारत निवडणूक आयोगाकडून दिनांक २१/५/२०१८ पर्यंत अद्ययावत केलेली विधानसभेची मतदार यादी सांगली मिरज आणि कुपवाड व जळगाव महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता तसेच अन्य महानगरपालिकेमधील पोटनिवडणुकीकरीता वापरण्यात येईल.

याकरीता भारत निवडणूक आयोगाने दि. १० जानेवारी, २०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या मतदार यादीच्या आधारे प्रभागनिहाय मतदारांचे विभाजन करण्याची कार्यवाही तात्काळ सुरु करण्यात यावी.

दि. १० जानेवारी ते २१ मे, २०१८ या कालावधीत संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांनी अंतिम निर्णय घेऊन विधानसभा मतदार यादीमध्ये दाखल केलेली नवीन नावे, दुरुस्त्या इ. महानगरपालिकेने प्राप्त करुन घ्याव्यात व त्या मतदारांचेही निवडणूक प्रभागनिहाय विभाजन करावे. याकरीता या कार्यालयाच्या क्र.रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.५३/का-५ च्या पत्रासोबत पाठविण्यात आलेल्या दि.२६/१०/२०१७ च्या आदेशातील सूचनांनुसार कार्यवाही करावी.

